सत्यमेव जयते

विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

(२०१७-२०१८)

'विजयनगर व मुंढे, ता. कराड, जि. सातारा येथील कोयना प्रकल्पग्रस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (महापारेषण कंपनी) व शासनाच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी यांच्या करारानुसार प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून कायमस्वरूपी महापारेषण कंपनीच्या सेवेमध्ये नोकरी देणेबाबत' या विषयावरील श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा

अहवाल

(दिनांक जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर
जुलै, २०१८

विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

२०१७-२०१८

'विजयनगर व मुंढे, ता. कराड, जि. सातारा येथील कोयना प्रकल्पग्रस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (महापारेषण कंपनी) व शासनाच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी यांच्या करारानुसार प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून कायमस्वरूपी महापारेषण कंपनीच्या सेवेमध्ये नोकरी देणेबाबत' या विषयावरील श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा

अहवाल

विनंती अर्ज समिती

(२०१७-२०१८)

१. श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

२. श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

३. प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

४. श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.

५. श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

*१ ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

*२ ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**३ प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM)

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

* ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. व ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांची दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

** प्रा. जोगेंद्र कवाडे, वि. प. स. यांची दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी विशेष निमंत्रित म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

विनंती अर्ज समिती

(२०१६-२०१७)

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

(२) *श्री. गिरीष व्यास, वि.प.स.

(३) *प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(४) *श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(५) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

श्री. कपिल पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री. यु. के. चव्हाण, सचिव

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

*सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, प्रकाश बिनसाळे, अमरनाथ राजुरकर, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागी अनुक्रमे सर्वश्री गिरीष व्यास, तानाजी सावंत, आनंद ठाकूर वि.प.स. यांची दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

प्रस्तावना

"विजयनगर व मुंढे, ता. कराड, जि. सातारा येथील कोयना प्रकल्पग्रस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (महापारेषण कंपनी) व शासनाच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी यांच्या करारानुसार प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून कायमस्वरूपी महापारेषण कंपनीच्या सेवेमध्ये नोकरी देणेबाबत" या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दिली व दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट-एक)

विनंती अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत शासनाकडून आवश्यक ती माहिती मिळावी म्हणून उक्त विनंती अर्ज उद्योग, ऊर्जा व कामगार(ऊर्जा) विभागाकडे पाठविण्यात आला. या संबंधीची माहिती दिनांक २५ जानेवारी, २०१७ व दिनांक २६ मे, २०१७ रोजी ऊर्जा विभागाकडून प्राप्त झाली.

समितीने विनंती-अर्जाच्या संदर्भात विनंती अर्ज सादर करणा-या मूळ विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव, मुख्य व्यवस्थापक, महापारेषण व अन्य अधिका-यांच्या दिनांक २९ मे, २०१७ रोजी साक्ष नोंदविली.

विनंती-अर्जासंबंधी विभागाने पाठविलेली माहिती (परिशिष्ट-दोन) तसेच साक्षीच्या वेळी समितीस मिळालेली अधिक माहिती याचा सर्वंकष विचार करून समितीने अहवाल तयार केला व दिनांक १७ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत संमत केला.

विधान भवन :
नागपूर,
दिनांक १७ जुलै, २०१८

माणिकराव ठाकरे,
उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा,
समिती प्रमुख, विनंती-अर्ज समिती.

अहवाल

मी विधानपरिषद विनंती-अर्ज समितीचा समितीप्रमुख, समितीच्या वतीने हा अहवाल सादर करीत आहे.

"विजयनगर व मुंढे, ता. कराड, जि. सातारा येथील कोयना प्रकल्पग्रस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (महापारेषण कंपनी) व शासनाच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी यांच्या करारानुसार प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून कायमस्वरूपी महापारेषण कंपनीच्या सेवेमध्ये नोकरी देणेबाबत" या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दिली व दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट-एक)

अर्जदारांनी विनंती अर्जात नमूद केले आहे की, विजयनगर व मुंढे, ता. कराड, जि. सातारा येथील कोयना प्रकल्पग्रस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (महापारेषण कंपनी) व शासनाच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी यांच्या करारानुसार प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून कायम स्वरूपी महापारेषण कंपनीच्या सेवेमध्ये नोकरी देणेचे दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी सभागृहामध्ये निश्चित करण्यात आले होते. मा. मंत्री महोदयांनी सदर विषयाबद्दल शासनातर्फे आश्वासन सुध्दा दिलेले होते. परंतु महाराष्ट्र विद्युत पारेषण कंपनीकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तरी विजय नगर व मुंढे, ता. कराड, जि. सातारा येथील प्रकल्पग्रस्तांना कंपनीत त्वरीत नोकरी मिळण्यासाठी ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेऊन त्यांना त्वरीत ऊर्जा विभागात सामावून घेण्याबाबत विनंती केली आहे.

समितीला दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी उद्योग ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभागाने पाठविलेल्या माहिती (परिशिष्ट-दोन अ) मध्ये असे नमूद केले आहे की,विजयनगर/मुंढे येथील जमीन संपादनामुळे बाधित झालेल्या व्यक्तींपैकी २३ प्रकल्पग्रस्त व्यक्ती कंपनीच्या खर्चाने वीजतंत्री या व्यवसायातील दोन वर्षाच्या औद्योगिक प्रशिक्षणास इच्छुक आहेत. सदर इच्छुक प्रकल्पग्रस्तांना दिनांक ४ जुलै, २०१२ च्या शासन निर्णयानुसार मंजुर औद्योगिक प्रशिक्षण संस्थापैकी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, फलटण

व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड, पुणे येथे त्यांच्या प्राधान्यक्रमानुसार प्रशिक्षणास पाठविण्याकरीता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडून सत्र २०१६-१८ करीता प्रत्येकी एक तुकडीची परवानगी प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदर २३ इच्छुक प्रकल्पग्रस्तांना कंपनीच्या खर्चाने औद्योगिक प्रशिक्षणास पाठविण्यात येत आहे. औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर ज्यावेळी सरळसेवा भरतीने रिक्त पदे भरण्याची जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल. त्यावेळी रीतसर अर्ज केल्यास स्पर्धा परीक्षेतील गुणवत्तेनुसार व प्रकल्पग्रस्तांकरीता असलेल्या कंपनीच्या धोरणानुसार त्यांना सेवेत सामावून घेण्यात येईल. महानिर्मिती कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांच्या धोरणाच्या धर्तीवर महापारेषण कंपनीचे जे पात्र प्रकल्पग्रस्त ज्यांची शैक्षणिक अर्हता कमी आहे किंवा ज्या प्रकल्पग्रस्तांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केली आहेत किंवा ज्या प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त दाखल्याच्या आधारे अद्याप शासकीय अथवा निम शासकीय अथवा वीज मंडळात/कंपनीत नोकरी मिळालेली नाही किंवा स्वतःचा खाजगी /व्यवसाय उद्योग करू इच्छितात अशा इच्छुक प्रकल्पग्रस्तांना नोकरीच्या बदल्यात एकरक्कमी अनुदान रूपये ५ लाख देण्याबाबतचा प्रस्ताव आहे. सद्यःस्थितीत मौजे विजयनगर व मुंढे येथील २३ इच्छुक प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या प्राधान्यक्रमानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था, फलटण व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड, पुणे येथे कंपनी खर्चाने प्रशिक्षणास पाठविण्यात आले आहे. सदर औद्योगिक प्रशिक्षण हे माहे ऑगस्ट-२०१६ मध्ये सुरू करण्यात आलेले आहे. प्रकल्पग्रस्तांसाठी महापारेषण कंपनीतर्फे खालील योजना राबविण्यात येत आहेत–

प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ३०२ दिनांक २५ नोव्हेंबर,२०११ अन्वये २ वर्षाच्या आय.टी. आय. (वीजतंत्री व्यवसाय) प्रशिक्षणासाठी आय.टी. आय. संस्थेकडे प्रतिनियुक्ती केली जाते व दरमहा रूपये २०००/- इतके मानधन दिले जाते.

तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदासाठी सरळसेवा भरतीमधील लेखी ऑन लाईन परिक्षेस त्यांना मिळालेल्या गुणांच्या १० अतिरीक्त गुण (Weightage) दिले जातात.

प्रकल्पग्रस्तांकरीता प्रगत कुशल प्रशिक्षण योजना, अतिरीक्त गुण योजना, नोकरीच्या बदल्यात एक रक्कमी अनुदान योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजने अंतर्गत ज्या प्रकल्पग्रस्तांनी आयटीआय (वीजतंत्री) व्यवसाय परिक्षा उत्तीर्ण केली

आहे, त्यांना कंपनीच्या प्रशिक्षण केंद्रात वयाची ४५ वर्ष पूर्ण होईपर्यंत अथवा कंपनीच्या नियमित सेवेत समाविष्ट होईपर्यंत दरमहा रूपये ६०००/-विद्यावेतन देण्यात येणार असून जे प्रकल्पग्रस्त ३ वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करतील त्यांना दरमहा रूपये ८०००/- विद्यावेतन देण्यात येईल.

प्रगत कुशल प्रशिक्षण योजना :-सदर योजने अंतर्गत वीजतंत्री या व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण पुर्ण ही अर्हता धारण करतात अशा प्रकल्पग्रस्तांकरीता प्रगत कुशल प्रशिक्षण देणे त्यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान मासिक विद्यावेतन देणे. सदर प्रशिक्षण हे प्रकल्पग्रस्तांची वयाची ४५ वर्षे पूर्ण किंवा कंपनीच्या सेवेत सामावून घेणे या पैकी जो कालावधी अगोदरचा असेल तोपर्यंत प्रशिक्षण चालू ठेवणे.

अतिरिक्त गुण योजना :-प्रगतकुशल प्रशिक्षणार्थी यांचेकरीता तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदाच्या सरळसेवा भरतीत त्यांनी लेखी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांव्यतिरिक्त २५ अतिरिक्त गुण देणे. सदर २५ अतिरिक्त गुण त्यांनी पूर्ण केलेल्या १ वर्षाच्या प्रगत कुशल प्रशिक्षणाकरीता ५ गुण असे ५ वर्षाकरीता जास्तीत जास्त २५ अतिरिक्त गुण देणे. तथापि, प्रगत कुशल प्रशिक्षण ही योजना सुरू होऊन २ वर्षाच्या आत कंपनीतर्फे खुली जाहिरात प्रसिध्द केल्यास सद्यस्थितीतील १०% अतिरिक्त गुणाच्या योजनेनुसार प्रकल्पग्रस्त उमेदवारांना त्यांनी लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांवर १०% अतिरिक्त गुण देणे.

एकरकमी अनुदान योजना :-महापारेषण कंपनीच्या पात्र प्रकल्प बाधीत व्यक्तीस नोकरीच्या बदल्यात विहित अटी व शर्तीवर एकरकमी रूपये ५ लाख अनुदान देण्याची योजना आहे. कंपनीच्या प्रगत कुशल योजनेमधील प्रकल्पग्रस्तांना ५०% आरक्षण लागू करावे किंवा कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांना तंत्रज्ञ श्रेणी-४ च्या पदासाठी अधिकचे ८% आरक्षण देणेबाबतचा प्रस्ताव मदत व पुनर्वसन आणि सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायांसाठी सादर केला आहे.

समितीच्या दिनांक २९ मे, २०१७ रोजीच्या बैठकीच्या वेळी उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन ब) मध्ये असे नमूद केले आहे की, विजयनगर/मुंढे येथील जमिन संपादनामुळे बाधित झालेल्या व्यक्तींपैकी २३ प्रकल्पग्रस्त व्यक्तींना कंपनीच्या खर्चाने वीजतंत्री या व्यवसायातील दोन वर्षाच्या

औद्योगिक प्रशिक्षणास पाठविण्यात आले आहे. औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर ज्यावेळी सरळसेवा भरतीने रिक्त पदे भरण्याची जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल, त्यावेळी रीतसर अर्ज केल्यास स्पर्धा परीक्षेतील गुणवत्तेनुसार व प्रकल्पग्रस्तांकरीता असलेल्या कंपनीच्या धोरणानुसार त्यांना सेवेत सामावून घेण्यात येईल. महानिर्मिती कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांच्या धोरणाच्या धर्तीवर, महापारेषण कंपनीचे जे पात्र प्रकल्पग्रस्त ज्यांची शैक्षणिक अर्हता कमी आहे किंवा ज्या प्रकल्पग्रस्तांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केली आहेत किंवा ज्या प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त दाखल्याच्या आधारे अद्याप शासकीय अथवा निम शासकीय अथवा वीज मंडळात /कंपनीत नोकरी मिळालेली नाही किंवा स्वतःचा खाजगी व्यवसाय /उद्योग करू इच्छितात अशा इच्छुक प्रकल्पग्रस्तांना नोकरीच्या बदल्यात एकरकमी रूपये ५ लाख देण्याबाबत कंपनीने प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ४९२, दिनांक २० सप्टेंबर, २०१६ निर्गमित केलेले आहे. ज्या प्रकल्पग्रस्तांची वयोमर्यादा ४५ वर्षापेक्षा जास्त आहे अशा तीन उमेदवारांना कळविण्यात आले आहे. तथापि, त्यांचेकडून प्रतिसाद मिळालेला नाही. प्रकल्पग्रस्तांसाठी महापारेषण कंपनीतर्फे खालील योजना राबविण्यात येत आहेत :–

प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ३०२ दिनांक २५ नोव्हेंबर, २०११ अन्वये २ वर्षाच्या आय.टी.आय. (वीजतंत्री व्यवसाय) प्रशिक्षणासाठी आय. टी. आय. संस्थेकडे प्रतिनियुक्ती केली जाते व दरमहा रूपये २०००/- इतके मानधन दिले जाते.

प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ४५१ दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ अन्वये तंत्रज्ञ श्रेणी -४ पदासाठी सरळसेवा भरतीमधील लेखी ऑन-लाईन परिक्षेस त्यांना मिळालेल्या गुणांच्या १० अतिरिक्त गुण (Weightage) दिले जातात.

प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ४९२ दिनांक २० सप्टेंबर, २०१६ नुसार प्रकल्पग्रस्तांकरीता प्रगत कुशल प्रशिक्षण योजना, अतिरिक्त गुण योजना, नोकरीच्या बदल्यात एकरकमी अनुदान योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत ज्या प्रकल्पग्रस्तांनी आयटीआय (वीजतंत्री) व्यवसाय परिक्षा उत्तीर्ण केली आहे, त्यांना कंपनीच्या प्रशिक्षण केंद्रात वयाची ४५ वर्षे पूर्ण होईपर्यंत अथवा कंपनीच्या नियमित सेवेत समाविष्ट होईपर्यंत दरमहा रूपये ६०००/- विद्यावेतन देण्यात येणार असून जे प्रकल्पग्रस्त ३ वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करतील त्यांना दरमहा रूपये ८०००/- विद्यावेतन देण्यात येईल.

प्रगत कुशल प्रशिक्षण योजना :-सदर योजने अंतर्गत 'वीजतंत्री' या व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण (ITI in Electrician Trade) ही अर्हता धारण करतात अशा प्रकल्पग्रस्तांकरीता प्रगत कुशल प्रशिक्षण देणे त्यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान मासिक विद्यावेतन देणे. सदर प्रशिक्षण हे प्रकल्पग्रस्तांची वयाची ४५ वर्षे पूर्ण किंवा कंपनीच्या सेवेत सामावून घेणे या पैकी जो कालावधी अगोदरचा असेल तोपर्यंत प्रशिक्षण चालू ठेवणे.

अतिरिक्त गुण योजना :-प्रगतकुशल प्रशिक्षणार्थी यांचेकरीता तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदाच्या सरळसेवा भरतीत त्यांनी लेखी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांव्यतिरिक्त २५ अतिरिक्त गुण देणे. सदर २५ अतिरिक्त गुण त्यांनी पूर्ण केलेल्या १ वर्षाच्या प्रगत कुशल प्रशिक्षणाकरीता ५ गुण असे ५ वर्षाकरीता जास्तीत जास्त २५ अतिरिक्त गुण देणे. तथापि, प्रगत कुशल प्रशिक्षण ही योजना सुरू होऊन २ वर्षाच्या आत कंपनीतर्फे खुली जाहिरात प्रसिध्द केल्यास सद्यस्थितीतील १०% अतिरिक्त गुणांच्या योजनेनुसार प्रकल्पग्रस्त उमेदवारांना त्यांनी लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांवर १०% अतिरिक्त गुण देणे.

एकरकमी अनुदान योजना :-महापारेषण कंपनीच्या पात्र प्रकल्प बाधीत व्यक्तीस नोकरीच्या बदल्यात विहित अटी व शर्तीवर एक रकमी रूपये ५ लाख अनुदान देण्याची योजना आहे.

समितीच्या दिनांक २९ मे, २०१७ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी अशी माहिती समितीस दिली की, सदरहू प्रकल्पग्रस्तांना शासकीय धोरणानुसार शासकीय सेवेमध्ये ५% आरक्षण दिलेले आहे. प्रकल्पग्रस्तांनी स्पर्धात्मक परिक्षेला बसायचे आहे ज्यावेळी परिक्षा होईल त्यावेळी हे सर्व पिएपी बसू शकतात. कंपनी स्तरावर आयटीआय झालेल्या विद्यार्थ्यांना १० अतिरिक्त गुण देण्याचा निर्णय कंपनीने घेतला आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे हे प्रकल्पग्रस्तांच्या व्याख्येत बसत नव्हते म्हणून जिल्हाधिका-यांनी या मुलांना एमएसईबीच्या परीक्षेपुरते दाखले दिलेले आहेत. दोन वर्षाचा आयटीआयचा कोर्स शिकून आल्यानंतर जेव्हा परिक्षेला बसतील तेव्हा त्यांना १००% प्राधान्य मिळून नोकरीस लागतील. प्रकल्पग्रस्त एकूण ४५ असून त्यापैकी २३ मुले आयटीआय साठी गेलेले आहे. तसेच ग्रॅज्युएट व नॉन ग्रॅज्युएट साठी वेगळा विचार

आहे. सन २००९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत की, कुठलीही भरती स्पर्धा परिक्षेशिवाय घ्यायची नाही. आयटीआय झालेल्या मुलांना प्रत्येक वर्षी ५ गुण देता येतील. आयटीआय झालेले, ग्रॅज्युएट, नॉन ग्रॅज्युएट त्यांनाही कायमस्वरूपी काही मानधन, प्रशिक्षणार्थी म्हणून देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. ग्रॅज्युएट झालेल्या मुलांना ८ हजार रूपये द्यावयाचे ठरविले आहे. आयटीआय प्रशिक्षण घेणा-या १९ लोक ३० वर्षापेक्षा कमी तर ३ लोक ४० वर्षापेक्षा जास्त वयाचे आहेत. म्हणजे जवळपास ८०% प्रशिक्षणार्थी ३० वर्षापेक्षा कमी वयाचे आहेत. त्यामुळे लोकांचे जास्त नुकसान होत नाही. ज्यांचे वय ४५ पेक्षा जास्त झाले आहे ते खाजगी व्यवसाय करू इच्छितात त्यांना शासनाच्या परिपत्रकानुसार ५ लाख रूपये एकरकमी रक्कम नोकरीच्या बदल्यात मिळते. परंतु त्यात वाढ करून निदान २५ लाख रूपये तरी मिळावे. ज्यापदाची परिक्षा घ्यावयाची आहे त्या पदाची अर्हता प्राप्त करण्यासाठी आयटीआय करणे आवश्यक आहे. जास्त वयाचे ४-५ लोक आहेत. त्यांची मुले शिक्षित असतील तर त्या मुलांना नोकरीमध्ये घेण्यात यावे. प्रकल्पग्रस्तांमध्ये तीन कॅटॅगरी आहे. पहिली कॅटॅगरी म्हणजे आयटीआय प्रमाणपत्र धारक, दुसरे पदवीधर व तिसरे म्हणजे दहावी पेक्षा कमी शिक्षीत. तिस-या कॅटॅगरीमधील उमेदवाराची शैक्षणिक पात्रता कोणत्याही पदाच्या अर्हतेच्या समकक्ष नाही. दुस-या व तिस-या कॅटॅगरीमधील उमेदवारांनाही बेसिक गुण देण्याची सवलत लागू करणार आहोत. पदवीधर यांना १० हजार रूपये मानधन तसेच वाहन चालक किंवा शिपाईच्या समकक्ष पात्रतेचे प्रशिक्षणार्थी ५-६ हजार रूपये मानधन व मदतनीस म्हणून काम देण्याचा विचार सुरू आहेत. वाहन चालकासाठी परवाना असणे आवश्यक आहे, त्याचबरोबर इयत्ता चौथी किंवा सातवी असणे आवश्यक आहे.

अभिप्राय व शिफारशी :–विजयनगर व मुंढे, तालुका कराड, जिल्हा सातारा येथील कोयना प्रकल्पग्रस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (महापारेषण कंपनी) व शासनाच्या वतीने जिल्हाधिकारी, सातारा यांच्या करारानुसार प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून कायम स्वरूपी महापारेषण कंपनीच्या सेवेमध्ये नोकरी देणेबाबत' या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. आनंदराव पाटील यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहास सादर केली.

सदर विनंती अर्जात नमूद केले आहे की, विजयनगर व मुंढे, तालुका कराड, जिल्हा सातारा येथील कोयना प्रकल्पग्रस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (महापारेषण कंपनी) व शासनाच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी यांच्या करारानुसार प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून कायम स्वरूपी महापारेषण कंपनीच्या सेवेमध्ये नोकरी देण्याचे दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी सभागृहामध्ये निश्चित करण्यात आले होते. मा. मंत्री महोदयांनी सदर विषयाबाबत आश्वासनही दिलेले होते. परंतु विद्युत पारेषण कंपनीकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तरी विजयनगर व मुंढे, ता. कराड, जि. सातारा येथील प्रकल्पग्रस्तांना कंपनीत त्वरीत नोकरी मिळण्यासाठी ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेवून त्यांना त्वरीत ऊर्जा विभागात सामावून घेण्याबाबत विनंती अर्जदारांनी आपल्या अर्जात विनंती केली आहे.

विभागाने दिलेल्या माहितीत नमूद केले आहे की, मा. श्री. आनंदराव पाटील व इतर मा. विधानपरिषद सदस्य यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१६ मध्ये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १६०६ च्या अनुषंगाने मा. मंत्री (ऊर्जा) महोदय यांनी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने महापारेषण कंपनीने खालील प्रमाणे कार्यवाही केलेली आहे. विजयनगर/मुंढे येथील जमिन संपादनामुळे बाधित झालेल्या व्यक्तींपैकी २३ प्रकल्पग्रस्त व्यक्तींना कंपनीच्या खर्चाने वीजतंत्री या व्यवसायातील दोन वर्षाच्या औद्योगिक प्रशिक्षणास पाठविण्यात आले आहे. औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर ज्यावेळी सरळसेवा भरतीने रिक्त पदे भरण्याची जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल, त्यावेळी रीतसर अर्ज केल्यास स्पर्धा परीक्षेतील गुणवत्तेनुसार व प्रकल्पग्रस्तांकरीता असलेल्या कंपनीच्या धोरणानुसार त्यांना सेवेत सामावून घेण्यात येईल. महानिर्मिती कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांच्या धोरणाच्या धर्तीवर, महापारेषण कंपनीचे जे पात्र प्रकल्पग्रस्त ज्यांची शैक्षणिक अर्हता कमी आहे किंवा ज्या प्रकल्पग्रस्तांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केली आहेत किंवा ज्या प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त दाखल्याच्या आधारे अद्याप शासकीय अथवा निम शासकीय अथवा वीज मंडळात /कंपनीत नोकरी मिळालेली नाही किंवा स्वतःचा खाजगी व्यवसाय /उद्योग करू इच्छितात अशा इच्छुक प्रकल्पग्रस्तांना नोकरीच्या बदल्यात एकरकमी रूपये ५ लाख देण्याबाबत कंपनीने प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ४९२, दिनांक २० सप्टेंबर, २०१६ निर्गमित केलेले आहे. ज्या प्रकल्पग्रस्तांची वयोमर्यादा ४५ वर्षापेक्षा जास्त आहे अशा तीन उमेदवारांना कळविण्यात आले आहे.

तथापि, त्यांचेकडून प्रतिसाद मिळालेला नाही. हे म्हणजे समितीला पटण्यासारखे नाही. उपरोक्त नमूद केलेल्या परिपत्रकाप्रमाणे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे असे समितीस वाटते.

प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ३०२, दिनांक २५ नोव्हेंबर, २०११ अन्वये २ वर्षाच्या आय.टी.आय. (वीजतंत्री व्यवसाय) प्रशिक्षणासाठी आय. टी. आय. संस्थेकडे प्रतिनियुक्ती केली जाते व दरमहा रूपये २०००/- इतके मानधन दिले जाते.

प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ४५१, दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ अन्वये तंत्रज्ञ श्रेणी -४ पदासाठी सरळसेवा भरतीमधील लेखी ऑन-लाईन परिक्षेस त्यांना मिळालेल्या गुणांच्या १० अतिरिक्त गुण (Weightage) दिले जातात.

प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ४९२, दिनांक २० सप्टेंबर, २०१६ नुसार प्रकल्पग्रस्तांकरीता प्रगत कुशल प्रशिक्षण योजना, अतिरिक्त गुण योजना, नोकरीच्या बदल्यात एकरकमी अनुदान योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत ज्या प्रकल्पग्रस्तांनी आयटीआय (वीजतंत्री) व्यवसाय परिक्षा उत्तीर्ण केली आहे, त्यांना कंपनीच्या प्रशिक्षण केंद्रात वयाची ४५ वर्षे पूर्ण होईपर्यंत अथवा कंपनीच्या नियमित सेवेत समाविष्ट होईपर्यंत दरमहा रूपये ६०००/- विद्यावेतन देण्यात येणार असून जे प्रकल्पग्रस्त ३ वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करतील त्यांना दरमहा रूपये ८०००/- विद्यावेतन देण्यासंदर्भात शासनाचे परिपत्रक आहे त्याची अंमलबजावणी होणे का याबाबत समितीस संदेह आहे.

प्रगत कुशल प्रशिक्षण योजना :-सदर योजने अंतर्गत " वीजतंत्री " या व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण (ITI in Electrician Trade) ही अर्हता धारण करतात अशा प्रकल्पग्रस्तांकरीता प्रगत कुशल प्रशिक्षण देणे, त्यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान मासिक विद्यावेतन देणे. सदर प्रशिक्षण हे प्रकल्पग्रस्तांची वयाची ४५ वर्षे पूर्ण किंवा कंपनीच्या सेवेत सामावून घेणे या पैकी जो कालावधी अगोदरचा असेल तोपर्यंत प्रशिक्षण चालू ठेवणे. इत्यादी तसेच-

अतिरिक्त गुण योजना :-प्रगतकुशल प्रशिक्षणार्थी यांचेकरीता तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदाच्या सरळसेवा भरतीत त्यांनी लेखी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांव्यतिरिक्त २५ अतिरिक्त गुण देणे. सदर २५ अतिरिक्त गुण त्यांनी पूर्ण केलेल्या १ वर्षाच्या प्रगत

कुशल प्रशिक्षणाकरीता ५ गुण असे ५ वर्षाकरीता जास्तीत जास्त २५ अतिरिक्त गुण देणे. तथापि, प्रगत कुशल प्रशिक्षण ही योजना सुरू होऊन २ वर्षाच्या आत कंपनीतर्फे खुली जाहिरात प्रसिध्द केल्यास सद्यःस्थितीतील १०% अतिरिक्त गुणाच्या योजनेनुसार प्रकल्पग्रस्त उमेदवारांना त्यांनी लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांवर १०% अतिरिक्त गुण देणे. इत्यादी तरतुदी असून त्याची अंमलबजावणी देखील होणे आवश्यक आहे.

एकरकमी अनुदान योजना :-महापारेषण कंपनीच्या पात्र प्रकल्प बाधीत व्यक्तीस नोकरीच्या बदल्यात विहित अटी व शर्तीवर एकरकमी रूपये ५ लाख अनुदान देण्याची योजना आहे. याबाबत प्रकल्पग्रस्तांची आकडेवारी समितीसमोर येणे आवश्यक होते, जेणेकरून किंती प्रकल्पग्रस्तांना याचा लाभ झाला शिवाय रक्कम रूपये ५ लक्ष पुरेसे आहे किंवा कसे हे देखील तपासणे महत्वाचे आहे असे समितीला वाटते.

साक्षीच्या वेळी विनंती अर्जदारांनी नमूद केले की, त्यांच्या जमिनी या कोयना धरणात सन १९५८-५९ मध्ये गेलेल्या होत्या. त्या बदल्यात कराड तालुक्यातील मुंढे व विजयनगर या गावांत गायरान जमिनीचे वाटप शासनाकडून करण्यात आले होते. त्या जमिनी ते कसत असताना या पूर्वी विज वितरण कंपनीचे तेथे २२० केव्हीचे उपकेंद्र पूर्वी होते आणि ज्यावेळी ४२० केव्ही उपकेंद्र नवीन करण्याचा विज वितरण कंपनीचा निर्णय झाला, त्यावेळी शासना मार्फत आमची जमिन संपादित करण्यासाठी आदेश आले. तथापि, तत्कालिन जिल्हाधिकारी यांनी कोयना धरणाच्या प्रकल्पग्रस्तांच्या त्या जमिनी असल्याने घेऊ नयेत असे शासनाच्या वतीने पत्र विज वितरण कंपनीला दिले होते. तथापि, त्यावेळी विज वितरण कंपनीचे वरिष्ठ अधिकारी तेथे आले होते. पूर्वीचे उपकेंद्र छोटे होते आणि त्याच अनुषंगाने पाठीमागचे ४२० केव्हीचे झाले तर विज वितरण कंपनीला खर्चाचा भूर्दंड फार मोठ्या प्रमाणावर होईल असे त्यांचे मत होते. त्यावेळी तत्कालीन जिल्हाधिका-यांनी सांगितले होते की, ह्या लोकांच्या जमिनी तुम्हाला घेता येणार नाहीत कारण हे कोयना धरणाचे प्रकल्पग्रस्त लोक असून त्यांना शासनाने अगोदरच तुटपुंज्या जमिनी दिल्या आहेत. यानंतर यामध्ये तडजोड झाली व असे ठरले की, ज्या कुटुंबाच्या जमिनी जातील त्या प्रत्येक कुटुंबातील एक माणूस नोकरी मध्ये घेतला जाईल. तसेच मा. ऊर्जा मंत्री यांनी सभागृहात सांगितले आहे की, शैक्षणिक पात्रतेनुसार सुध्दा प्रकल्पग्रस्तांना शासन सेवेत घेतले जाईल. तथापि, अद्याप सदर आश्वासन पाळले गेले नाही. आज त्या प्रकल्पगस्तांच्या मुलांचे वय ४२

वर्षाच्या आसपास आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबावर किती अन्याय झाला आहे याचा विचार विज वितरण कंपनी कडून अजूनही झालेला नाही.

विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी नमूद केले की, सदरहू प्रकल्पग्रस्तांना शासकीय धोरणानुसार शासकीय सेवेमध्ये पाच टक्के आरक्षण दिलेले आहे. या प्रकल्पग्रस्तांनी स्पर्धात्मक परिक्षेला बसावयाचे आहे. ज्यावेळी ही परिक्षा होईल त्या वेळी हे उमेदवार परिक्षेला बसू शकतात. याना विशेष प्राधान्य नाही. या प्रकल्पग्रस्त मुलांना प्रशिक्षण देऊन त्यांना परिक्षेला बसता येऊन यश मिळवता येईल. अशा पध्दतीची ही योजना आहे. अशा प्रकल्पग्रस्त मुलांना आय.टी.आय. साठी पाठविण्यात येते याचा खर्च कंपनी करेल आणि मुले प्रशिक्षित होतील. कंपनी स्तरावर आयटीआय झालेल्या विध्यार्थ्यांना दहा अतिरिक्त गुण देण्याचा कंपनीने निर्धार केलेला आहे. दोन वर्षाचा आयटीआयचा कोर्स आहे. ही मुले शिकून येतील आणि जेव्हा परिक्षेला बसतील तेव्हा त्यांना १०० टक्के प्राधान्य मिळेल आणि ते नोकरीला लागतील.

विजयनगर व मुंढे येथील प्रकल्पग्रस्तांचा विषय इतर प्रकल्पग्रस्तांपेक्षा वेगळा आहे. कोयना धरणात यांच्या जमिनी गेल्या आहेत त्याबदल्यात विजयनगर व मुंढे येथे त्यांना शासनाने जमिनी दिल्या. तथापि, विज वितरण कंपनीने उपकेंद्र उभारण्यासाठी त्याच ठिकाणच्या सदर प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी घेतल्या आहेत. त्यामुळे विनंती अर्जदार हे दोन वेळा प्रकल्पग्रस्त झाले आहेत. त्यामुळे येथील मुलांना नोकरी देण्यासंदर्भात खास बाब म्हणून कशापध्दतीने न्याय देता येईल हे पाहणे गरजेचे आहे. **एकूण प्रकल्पग्रस्त मुले ४५ असून त्यापैकी २३ मुले आयटीआय साठी पाठविण्यात आली आहेत. जी मुले आयटीआय साठी पाठविण्यात आली आहेत त्यांचे वय आता ४२ वर्षापर्यंत आहे. त्यांना दोन वर्षे आयटीआयचे प्रशिक्षण देणार आणि त्यांनतर नियमाप्रमाणे नोकरी मिळणार, तोपर्यंत त्यांचे वय वाढत जाणार आहे त्यामुळे भविष्यात त्यांना नोकरी मिळेलच याची खात्री देता येत नाही. प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी प्रकल्पात गेलेल्या असल्यामुळे त्यांना उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. या गोष्टींचा विचार करता विभागाने प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याची कार्यवाही सत्वर व वेळेवर केली असती तर सुशिक्षित बेरोजगारात असंतोष निर्माण झाला नसता. प्रकल्पग्रस्तांपैकी अनेक प्रकल्पग्रस्त नोकरीसाठी इच्छुक असताना देखील भरती प्रक्रिया किंवा त्यासाठी असलेली यंत्रणा वेळेत राबविल्या गेली नाही ही वस्तुस्थिती विचारात घेता या**

प्रकल्पग्रस्तांना जमिनी गेल्यानंतर त्यांना शासन सेवेत त्वरेने सामावून घेणे आवश्यक होते. परंतु नियमाव्दारे ती झाली नाही अतः पात्र प्रकल्पग्रस्तांना त्वरेने शासन सेवेत सामावून घेण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी. तसेच नोकरीत सामावून घेण्यासाठी सदर प्रकल्पग्रस्तांची वयोमर्यादा शिथिल करता येणे शक्य आहे काय, याबाबत विचार करावा व सदर प्रकरणी घेतलेल्या निर्णयाची माहिती ३ महिन्याच्या आत समितीला देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सदर प्रकल्पग्रस्त आयटीआय झालेल्या मुलांना प्रत्येक वर्षी वेगळे गुण द्यायचे आहेत. एखादा मुलगा आयटीआय झाल्यानंतर पहिल्या वर्षी पाच गुण, दुस-या वर्षी पाच गुण असे चार वर्षे झाले तर त्या मुलाला २० गुण देता येतील. पाच वर्षे झाली तर त्याला २५ गुण देता येतील असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी नमूद केले आहे. या मुलांना स्पर्धा परिक्षेला बसायचे आहे सदर परिक्षेत पास झाल्यानंतर त्यांना नोकरीत सामावून घेण्यात येणार आहे. स्पर्धा परिक्षेचा पेपर १०० गुणांचा असतो. मेरीट ५० ते ६० गुणापर्यंत बंद होते. आयटीआय नंतर ज्या मुलांची पाच वर्षे पूर्ण झालेली आहे त्यांना २५ गुण ग्रेस म्हणून मिळणार आहेत. तथापि, एखाद्या मुलाचे आयटीआय नंतर एकच वर्ष पूर्ण झाले असेल तर त्याला फक्त पाच गुण ग्रेस म्हणून मिळतील. **या योजनेमध्ये असे दिसून येते की, आयटीआय झाल्यानंतर १ वर्षानंतर ५ गुण ग्रेस गुण मिळतात व २५ गुणांसाठी पाच वर्षे वाट पहावी लागते तो पर्यंत सदर उमेदवाराचे वय वाढत असते व ४५ वर्षापेक्षा जास्त वय झाल्यास नोकरी मिळणे अवघड होईल. त्यामुळे समिती अशी शिफारस करते की, २५ गुणांचा स्लॅब कमी वर्षामध्ये पूर्ण करण्यासाठी विचार केल्यास प्रकल्पग्रस्तांना त्याचाही फायदा होईल. म्हणून यामध्ये प्रत्येक वर्षी ५ ऐवजी १० गुण देण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.**

आयटीआय करणा-या प्रकल्प बाधीत मुलांना दरमहा रुपये दोन हजार विद्यावेतन देण्यात येते. सदर दोन हजार रुपयांचे विद्यावेतन हे सध्याच्या महागाईच्या काळात अत्यंत तुटपुंजे आहे असे वाटते तसेच **सध्या मुलांना जी आयटीआय सेंटर दिलेली आहेत ती त्यांच्या गावांपासून व शहरापासून पाच ते सात किलोमीटर दूर आहेत तसेच तेथे गाड्या जात नाहीत व तेथे पाण्याचे दुर्भिक्ष आहे. पिण्याचे पाणीसुध्दा खूप दूरवरून आणावे लागते त्यामुळे त्यांची खूप गैरसोय होत असून खर्चाचे प्रमाणही**

वाढले आहे अशा परिस्थितीत २००० रुपये विद्यावेतन निश्चितच अपूरे पडत आहे. त्यामुळे समिती अशी शिफारस करते की, कोर्टाचा निर्णय, विभागाचे धोरण या सर्वांच्या अधीन राहून आयटीआय साठी पाठविलेल्या सदर मुलांच्या विद्यावेतनात काही वाढ करता येते का ते पहावे व त्याअनुषंगाने विद्यावेतनात वाढ करण्यासंदर्भात सत्वर निर्णय घेण्यासंदर्भात कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा. अशीही समिती शिफारस करीत आहे.

न्यायालयाच्या निर्णयानुसार प्रकल्पग्रस्त पात्र उमेदवारांना स्पर्धा परिक्षेस सामोरे जाऊन त्यामध्ये उत्तीर्ण झाल्यानंतर गुणवत्तेप्रमाणे सेवेमध्ये घेण्यात येते. अशी पध्दत आहे. कोयना धरणग्रस्तांना वेगळा न्याय देण्यासाठी ज्या खास सुधारणा करण्यात आल्या आहेत त्यामध्ये प्रकल्प बाधित विद्यार्थ्यांना महामंडळाच्या खर्चाने प्रशिक्षण दिले जात आहे ही फार चांगली बाब आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करते. **प्रशिक्षणानंतर स्पर्धा परिक्षा घेतली जाते त्याची गुणवत्ता यादी ६० टक्क्यापर्यंत असते. त्यामुळे या उमेदवारांना मार्गदर्शन करण्यासाठी परिक्षेपूर्वी एखादी कार्यशाळा घेतली तर त्याचा त्यांना नक्कीच फायदा होईल व त्यांना आवश्यक गुण मिळविणे अवघड होईल असे वाटत नाही. त्यामुळे समिती अशी शिफारस करते की, प्रकल्पबाधितांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्याबाबात संबधितांना सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.**

सदर प्रकल्पग्रस्तांमध्ये तीन प्रवर्ग आहेत. पहिला प्रवर्ग म्हणजे आयटीआय प्रमाणपत्रधारक दुसरा प्रर्वग पदवीधर उमेदवारांचा आहे व तिसरे म्हणजे १० वी पेक्षा कमी शिक्षित प्रवर्ग, तिस-या प्रवर्गातील उमेदवारांची शैक्षणिक पात्रता कोणत्याही पदाच्या अर्हतेच्या समकक्ष नाही. साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी नमूद केले आहे की, दुस-या व तिस-या प्रवर्गातील उमेदवारांनाही बेसीक गुण देण्याची सवलत लागू करणार आहे. तसेच या सर्वांना प्रशिक्षणार्थी म्हणून आपल्याकडे घेवून मानधन देण्याबाबतही विचार करण्यात येत आहे. जे पदवीधर आहेत त्याना १० हजार रुपये मानधन तसेच त्यांना मदतनीस म्हणून काम देणे. जे वाहन चालक किंवा शिपाई समकक्ष पात्रतेचे आहेत त्यांना प्रशिक्षणार्थी म्हणून ५ ते ६ हजार रुपयांचे मानधन व मदतनीस म्हणून काम देण्याचा विचार सुरू आहे. **याबाबत समिती अशी शिफारस करते की, प्रकल्पग्रस्तांमध्ये असलेल्या प्रवर्ग एक दोन व तीन बाबत विभागीय**

सचिवांनी नमूद केलेल्या उक्त योजनांबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा तसेच ज्या प्रकल्पग्रस्तांचे वय ४५ पेक्षा जास्त झाले आहे व त्यांची इच्छा असल्यास त्यांच्या मुलांना सेवेत सामावून घेण्यात यावे तसेच प्रकल्पग्रस्तांमध्ये पदवीधर किंवा उच्च शिक्षित असलेल्या व्यक्तींना किंवा त्यांच्या मुलांना विशेष बाब म्हणून शासन सेवेत सामावून घेण्यात यावे. उक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.

ज्या प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त झाले आहे व ज्यांना प्रकल्पग्रस्त दाखल्याच्या आधारे अद्याप शासकीय, निमशासकीय अथवा वीज मंडळात/कंपनीत नोकरी मिळालेली नाही किंवा स्वतःचा खाजगी व्यवसाय/उद्योग करू इच्छितात त्यांना नोकरीच्या बदल्यात एक रकमी रुपये ५ लाख देण्याबाबत शासनाने परिपत्रक काढले आहे. तथापि ५ लाख रुपये ही रक्कम अतिशय कमी होत आहे. असे समितीचे मत आहे. जमिनी दिल्यामुळे त्या कुटुंबावर किती अन्याय झालेला आहे याचा विचार एमएसईबी कडून होणे गरजेचे आहे. **प्रकल्पग्रस्तांनी जमिनी देवून फार मोठा त्याग केला आहे तथापि, आज जमीन नसल्यामुळे त्यांना दुसरे कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही, उदर निर्वाहाचे साधन नाही असे असताना त्यांना न्याय देताना दिरंगाई होत आहे. याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.** ज्यांच्या जमीनी प्रकल्पात गेलेल्या आहेत त्यांच्यांवर अन्याय होऊ नये अशी समितीची अपेक्षा आहे. कोयना प्रकल्प आज राज्यभर वीज नियंत्रित करतो. कोयना प्रकल्प ही आपल्या राज्याच्या दृष्टीने अतिशय अभिमानाची बाब आहे. राज्यात वीज निर्मितीचे ध्येय पूर्ण करण्यासाठी विभागाने तसा शब्द दिला असेल तर तो पाळावयाची जबाबदारी इतर विभागांची कमी असेल त्यापेक्षा जास्त जबाबदारी ऊर्जा विभागाची आहे. **या सर्व बाबी विचारात घेता समिती अशी शिफारस करते की, ज्या प्रकल्पबाधिताना वयाची ४५ वर्षे उलटूनही नोकरी मिळाली नाही त्यांना ५ लाख रूपये देण्याबाबत शासनाने जे परिपत्रक निर्गमित केले आहे याचा विभागाने फेरविचार करावा कारण वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेल्या व नोकरी न मिळालेल्या प्रकल्पग्रस्तांची संख्या फार थोडी म्हणजे केवळ ५ किंवा ६ अशी आहे. त्यामुळे याचा जास्त आर्थिक बोजा शासनावर पडणार नाही. म्हणून या प्रकल्पग्रस्तांना प्रत्येकी २० लाख रुपये देण्यात यावेत जेणेकरून सदर प्रकल्पग्रस्तांवरील अन्याय दूर होईल. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावी.**

विशेष शिफारस :-कोयना धरणाच्या निर्मितीच्या वेळेची परिस्थिती पाहून तेथील शेतक-यांनी स्वतःहून जमिनी दिल्या आहेत. स्वतःहून शासनाला मदत केली आहे. तेव्हा शेतक-यांना पूर्णपणे न्याय देवू असे आश्वासन त्यांना देण्यात आले होते. त्याबाबतचा करारनामा लेखी स्वरूपात झाला आणि त्याचे इतिवृत्तही कदाचित उपलब्ध असेल. त्याचा आधार घेऊन खास बाब म्हणून कोयना प्रकल्पग्रस्तांच्या मुलांसाठी प्रयत्न करता येतील, त्यांना न्याय देता येईल करारनामा आणि त्यावेळच्या इतिवृत्तामध्ये शब्द दिलेला आहे. तसेच मा. मंत्री महोदयांनी सभागृहात सकारात्मक शब्द दिलेला आहे हे विसरून चालणार नाही असे समितीचे मत आहे. कोयना प्रकल्प हा ऊर्जा विभागाला मदत करणारा प्रकल्प आहे. या प्रकल्पासारखा दुसरा प्रकल्प राज्यात नसेल. राज्यातील संपूर्ण वीज हा प्रकल्प नियंत्रित करतो त्यामुळे या प्रकरणी सकारात्मक भावना ठेवून व मा. मंत्रीमहोदयांनी सभागृहात आश्वासन दिल्यामुळे सदर प्रकल्पग्रस्तांना न्याय देणे गरजेचे आहे. **समितीने प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याच्या दृष्टीने केलेल्या उक्त शिफारशींची अंमलबजावणी करतांना किंवा कार्यवाही करताना यामध्ये काही तांत्रिक अडचणी येत असतील तर शासनाने याबाबतीत धोरणात्मक निर्णय घ्यावा व प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याच्या दृष्टीने समितीने केलेल्या उक्त शिफारशींवर लवकरात लवकर कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

परिशिष्ट-एक

मूळ विनंती अर्ज

परिशिष्ट - मक

महाराष्ट्र विधानपरिषद

आनंदराव पाटील
वि.प.स.

दिनांक :-13 डिसेंबर, २०१६.

प्रति,

मा. सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

विषय :- विजयनगर व मुंडे, ता. कराड, जि. सातारा येथील दुहेरी प्रकल्पग्रस्तांसाठी विशेष बाब म्हणून कंपनीत कायम स्वरुपी नोकरी देणेबाबत.

मा. महोदय,

विजयनगर व मुंडे, ता. कराड, जि. सातारा येथील कोयना प्रकल्पग्रस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (महापारेषण कंपनी) व शासनाच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी यांच्या करारानुसार प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून कायम स्वरुपी महापारेषण कंपनीच्या सेवेमध्ये नोकरी देणेचे दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी सभागृहामध्ये निश्चित करण्यात आले होते. मा. मंत्री महोदयांनी सदर विषयाबद्दल शासनातर्फे आश्वासन सुध्दा दिलेले होते. परंतु महाराष्ट्र विद्युत पारेषण कंपनीकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तरी विजय नगर व मुंडे, ता. कराड, जि. सातारा येथील प्रकल्पग्रस्तांना कंपनीत त्वरीत नोकरी मिळण्यासाठी ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन पुढाकार घेऊन त्यांना त्वरीत ऊर्जा विभागात सामावून घेण्याबाबत विनंती अर्ज समिती तर्फे आपल्या शिफारशीसह करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

Apak

(आनंदराव पाटील)

त्वरीत कार्यवाही करावी

प्रति,
मा.सभापती, मा. आनंदराव पाटील,
महाराष्ट्र विधानपरिषद, सदस्य,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान मंडळ, मुंबई.

विषय - विजयनगर व मुंढे ता.कराड जि.सातारा येथील दुहेरी प्रकल्पग्रस्तांसाठी विशेष बाब म्हणून कंपनीत कायमस्वरुपी नोकरी देणेबाबत..

अर्जदार - विजयनगर व मुंढे ता.कराड येथील दुहेरी प्रकल्पग्रस्त

महोदय,

विधान परिषद सदस्य मा.आनंदराव पाटील यांनी मार्च २०१६ च्या अधिवेशनामध्ये लावलेल्या लक्षवेधी प्रश्नाच्या अनुषंगाने मा.उर्जा मंत्री यांनी आपल्या समक्ष ४४ दुहेरी प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून गुणवत्तेनुसार कंपनीत नोकरी देण्याचे आश्वासन दिले होते. तद्नंतर सदरच्या आश्वासनावर मा.मंत्री महोदयांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

तरी आपणांस विनंती करणेत येते की, विधानपरिषदेत तत्वतः दिलेल्या मान्यतेनुसाप ४४ प्रकल्पग्रस्तांना कंपनीत सामावून घेणेबाबत संबधीत अधिका-यांना निर्देश द्यावेत ही विनंती.

सोबत - ४४ प्रकल्पग्रस्तांच्या सह्या

" निर्मलग्राम पुरस्कृत "

" स्वच्छतेतून समृध्दीचा ध्यास हाच आमचा ग्रामविकास "

ग्रामपंचायत मुंढे.

ता. कराड, जि. सातारा.

- शाळेला अगदी हाडा, गडांना लोटा वापरा.
- कुटुंब लहान, सुख महान.
- शासकीय विविध योजनेच्या लाभासाठी ग्रा.पं.संपर्क करा.
- आपले कांडवणी सोयाबाबांमध्ये सोडा.
- स्थानिक जन्म मृत्युची नोंद २१ दिवसाच्या आत ग्रा.पं. करे करा.

- आत्मस्वच्छ आरोग्यासाठी व राहणीसाठी.
- ग्रा.पं.करावी रक्कम मुदतीत भरून सहकार्य द्या.
- आपला परिसर स्वच्छ ठेवा, शक्य प्रदाराममध्ये लागू नका.
- गटारे मोकळी ठेवा.
- कुटुंबाची आरोग्य तपासा व नियमित उपचार करा.

जा. नं. प्रति, तारीख : / / २०१५

मा.सभापतीसो,

महाराष्ट्र विधानपरिषद,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

विधान मंडळ, मुंबई.

विषय - मौजे विजयनगर व मुंढे ता.कराड जि.सातारा येथील दुहेरी प्रकल्पग्रस्तांसाठी विशेष बाब म्हणून कंपनीत कायमस्वरुपी नोकरी देणेबाबत..

अर्जदार - सरपंच / उपसरपंच व मौजे मुंढे व विजयनगर ता.कराड येथील दुहेरी प्रकल्पग्रस्त

महोदय,

विधान परिषद सदस्य मा.आनंदराव पाटील यांनी मार्च २०१६ च्या अधिवेशनामध्ये लावलेल्या लक्षवेधी प्रश्नाच्या अनुषंगाने मा.ऊर्जा मंत्री यांनी आपल्या समक्ष ४४ दुहेरी प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून गुणवत्तेनुसार कंपनीत नोकरी देण्याचे आश्वासन दिले होते. तद्नंतर सदरच्या आश्वासनावर मा.मंत्री महोदयांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

तरी आपणांस विनंती करणेत येते की, विधानपरिषदेत तत्वतः दिलेल्या मान्यतेनुसार ४४ दुहेरी प्रकल्पग्रस्तांना कंपनीत सामावून घेणेबाबत संबधीत अधिका-यांना निर्देश द्यावेत ही नम्र विनंती.

उपसरपंच
ग्रामपंचायत मुंढे
ता. कराड, जि. सातारा

सरपंच
ग्रामपंचायत मुंढे
ता. कराड, जि. सातारा.

सोबत - ४४ प्रकल्पग्रस्तांच्या सह्यांची यादी

☎ (०२१६४) २५५००१

निर्मल ग्राम

स्थापना - २४/५/१९८५

ग्रामपंचायत, विजयनगर

मु. विजयनगर, पो. सुपने, ता. कराड, जि. सातारा

जावक नंबर :

दिनांक / / २०१

प्रति,

मा.सभापतीसो,

महाराष्ट्र विधानपरिषद,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

विधान मंडळ, मुंबई.

विषय - मौजे विजयनगर व मुंढे ता.कराड जि.सातारा येथील दुहेरी प्रकल्पग्रस्तांसाठी विशेष बाब म्हणून कंपनीत कायमस्वरूपी नोकरी देणेबाबत..

अर्जदार - सरपंच / उपसरपंच व मौजे विजयनगर व मुंढे ता.कराड येथील दुहेरी प्रकल्पग्रस्त

महोदय,

विधान परिषद सदस्य मा.आनंदराव पाटील यांनी मार्च २०१६ च्या अधिवेशनामध्ये लावलेल्या लक्षवेधी प्रश्नाच्या अनुषंगाने मा.ऊर्जा मंत्री यांनी आपल्या समक्ष ४४ दुहेरी प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून गुणवत्तेनुसार कंपनीत नोकरी देण्याचे आश्वासन दिले होते. तद्नंतर सदरच्या आश्वासनावर मा.मंत्री महोदयांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

तरी आपणांस विनंती करणेत येते की, विधानपरिषदेत तत्वतः दिलेल्या मान्यतेनुसार ४४ दुहेरी प्रकल्पग्रस्तांना कंपनीत सामावून घेणेबाबत संबंधीत अधिका-यांना निर्देश द्यावेत ही नम्र विनंती.

उपसरपंच
ग्रामपंचायत विजयनगर
ता. कराड, जि. सातारा

सरपंच
ग्रामपंचायत विजयनगर
ता. कराड, जि. सातारा

सोबत - ४४ प्रकल्पग्रस्तांच्या सह्यांची यादी

अ.क्र.	जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक	प्रकल्पग्रस्त घोषणे अंतर्गत नोकरी करीता अर्ज केलेल्या उमेदवाराचे नांव	नोंदणीचा अनुक्रांक दिनांक	उमेदवाराची शैक्षणिक अर्हता	जन्म दिनांक	वय	स्वाक्षरी
१	२	३	४	५	६	७	८
१	क्रमांक/पुनर्व/कोयना/कवि १४५ दि. ३१/१०/२०१३	तेजस बाबु गायकवाड	३१/१०/२०१३	इलेक्ट्रीक इंजिनिअर डिप्लोमा	१८/१०/१९९०	२६	
२	कोयना/एलआर/७५३ दि. १९/१०/२०१३	अमोल हनमंत जाधव	२९/१०/२०१३	बी.कॉम., एम.डी.ए.(चालकाचा)	२२/४/१९९२	२४	
३	क्रमांक पुनर्व/पुणे/एल.आर. १४२ दि. २१-०४-२०१३	दत्तात्रय बोंडीराम पाटील	१३/५/२०१३	बी.ए.	२०/०३/१९८२	३४	
४	क्रमांक पुनर्व/कोयना/कवि/एल.आर.-१२८ दि ३/०९/२०१२	अक्षय सभाजी पोळके	४/९/२०१२	बी.ए	२२/०५/१९८४	३२	
५	कोयना एलआर ३६६ दि. १/३/२०१४	जयसिंह रविंद्र वसंतदेव	२०/३/२०१४	बी. ए.	१८/५/१९७९	३५	
६	क्रमांक/पुनर्व/कोयना/कवि/१४९ दि. ११/०१/२०१३	विनोद प्रल्हाद गायकवाड	१३/०१/२०१३	S.Y.B.Com व ओडी डिप्लोमा व MS-CIT	५/६/१९८२	३१	
७	क्रमांक पुनर्व/कोयना/कवि/एल.आर.-१०४ दि. २४-०९-२०१२	प्रशांत शामराव मोरे	४/९/२०१२	एस.एस.सी.ए.	९/९/१९७२	४४	
८	क्रमांक पुनर्व/कोयना/कवि/एल.आर.-२१ दि. ३/०१/२०१३	प्रविण संभाजी जगताप	४/९/२०१२	एस.एस.सी.कॉम.	२६/०२/१९८४	३२	
९	क्रमांक/पुनर्व/कोयना/कवि/एल.आर. ४९	प्रथमेश सुरेश पवार	३/९/२०१२	१२ वी पास Diploma in Electrical Engineering (App.)	९/६/१९९६	२०	
१०	कोयना/पुनर्व/कोयना/कवि/५२ दि. १०/९/२०१२	महेश हनमंत पवार	१८/९/२०१२	१२ वी पास I.T.I. Electrical (App.)	१४/११/१९९४	२२	
११	क्रमांक/पुनर्व/पुणे/एल.आर. ११३/ दि. २०/०७/२०१६	मिलिंद दत्तात्रय जाधव	२०/७/२०१६	१२ वी पास (I.T.I. Wireman)	२६/६/१९८९	२७	
१२	क्रमांक पुनर्व/कोयना/कवि/एल.आर-१२१ दि. ०३/०९/२०१२	महेश महादेव साळवे	९/९/२०१२	१२ वी पास (I.T.I. Mechanic Refrigeration) (MS-CIT)	३/६/१९८८	२८	
१३	क्रमांक पुनर्व/कोयना/कवि/एल.आर.१२६ दि. ०३/०९/२०१२	अनिकेत भानुदास साळवे	५/९/२०१२	१२ वी पास	३/१/१९९०	२६	
१४	क्रमांक पुनर्व/कोयना/कवि/एल.आर.-१०६ दि. २४-०९-२०१२	विनोद सखाराम जगताप	...	१२ वी पास	१६/६/१९८४	३२	
१५	क्रमांक पुनर्व/कोयना/कवि/एल.आर.-१०० दि. २४/०९/२०१२	प्रशांत संभाजी संकपाळ	...	१२ वी पास	२९/०३/१९७४	४२	
१६	क्रमांक पुनर्व/कोयना/कवि/५७१४ दि. १/८/२०१२	सुरज प्रकाश सावंत	३३/८/२०१२	१२ वी पास I.T.I. (Electrical) App	२१/०५/१९९३	२३	
१७	क्रमांक पुनर्व/कोयना/कवि/एल.आर.-१०६ दि. २४-०९-२०१२	कृष्णदेवराय निवासी भट्टाल	४/९/२०१२	डी.इ.ई (अभीयर)	१२/५/१९९३	२३	
१८	क्रमांक पुनर्व/कोयना/कवि/एल.आर. लिंक दि. -०९-२०१२	महेश चंद्रकांत जगताडे	...	११ वी पास	६/४/१९९५	२५	
१९	क्रमांक पुनर्व/कोयना/कवि/एल.आर.-लिंक दि. ९-०९-२०१२	दर्शन गणपत जगताप	...	११ वी पास	८/९/१९९४	२२	
२०	क्रमांक/पुनर्व/पुणे/एल.आर. ५५०/ दि. २२/०६/२०१५	सुशांत महादेव साळवे	२२/६/२०१५	१० वी पास (Diploma in Electrical Engineering)	९/६/१९९१	२५	

२१	कोयना/खरि/६८४ दि. १४/०७/२०१३	रोहित रामराव यादव	२२/४/२०१३	१० वी पास (I.T.I. Mechanic Refrigeration) (MS-CIT)	१३/०१/१९९१	२१	
२२	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.-१३१ दि. ०३-०१-२०१२	संभाजी महादेव गोरे	४/१/२०१२	१० वी पास (I.T.I.) (CNC)	२०/११/१९८८	२८	
२३	हमांक/पुर्वा/कोयना/पुढे एस.आर १५२ दि. २०/४/२०१५	विजेंद्र नामदेव यादव	२३/४/२०१५	१० वी पास I.T.I. (Fitter)	१/६/१९९३	२३	N.H Pawar
२४	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.-१४१९ दि. ४-०८-२०१४	मिलिंद विश्वास चव्हाण		१० वी I.T.I. Electrical (App.)	२/६/१९९६	२०	
२५	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.-१३८ दि. ०३-०१-२०१२	प्रदिप विलास मकदुम	१/१/२०१२	१० वी पास (ऑटो रिपेरिंग) कृषी व्यवसाय व्यवस्थापन पदविका	१४/०५/१९८४	३२	
२६	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर-१२७ दि. ०३/०१/२०१२	विलास हनमंत वाघमारे	४/१/२०१२	१० वी पास	२०/०५/१९८६	४०	
२७	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.१२ दि. १५/०३/२०१३	गितेश सुरेश वाघमारे	२/३/२०१३	१० वी पास	१/४/१९९९	२१	
२८	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.-१२६ दि. २७/०१/२०१२	दत्तात्रय सर्वोत्तम जगताप	२८/०१/२०१२	१० वी पास	१९/०४/१९८४	३२	D.V. Jagtap
२९	हमांक/पुर्वा/कोयना/खरि/१४३ दि. ५/८/२०१३	तेजस विलास जाधव	२१/८/२०१३	१० वी पास	४/६/१९९३	२३	
३०	हमांक/पुर्वा/कोयना/खरि १३० दि. १५/६/२०१२	राहुल अर्जुनराव वाघमारे	११/६/२०१२	१० वी पास	८/६/१९८६	३०	R.A.Salgare
३१	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.-१३५ दि. २१/०१/२०१२	हनमंत भगवंती जगताप	४/१०/२०१२	१० वी पास	१/८/१९७४	४२	
३२	हमांक/पुर्वा/कोयना/खरि/१४१ दि. १९/०१/२०१३	प्रशांत शंकर सावंत	१३/०१/२०१३	१० वी पास I.T.I. (Fitter)	23/7/१९९२		
३३	हमांक/पुर्वा/कोयना/खरि/१००६	महादेव रामराव जाधव	२४/३/२०१४	९ वी (वाहन चालक) P-704KRD, T-606KRD	१०/१०/१९७१	३४	
३४	१०३३/९६ दि. २५/१०/१९९६	भास्कर दादा मकदुम	२४/३/२०१४	९ वी पास			
३५	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.-१३० दि. ०३-०१-२०१२	प्रदीप संभाजी मकदुम	४/१/२०१२	९ वी पास	२/४/१९९३	२३	Alhady
३६	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.-४० दि. ०३/०१/२०१२	सदुरु महादेव जगताप	४/१/२०१२	८ वी पास (वाहन चालक) P-13711STR हेवी ड्रायव्हर	२०/०६/१९७१	३४	
३७	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.-१३३ दि. ३/०१/२०१२	दादासो हनमंत पोतदार	४/१/२०१२	७ वी पास	१९/४/१९८०	३६	
३८	हमांक/पुर्वा/कोयना/खरि/एस.आर. १३९ दि. ३/१/२०१२	जयवंत लक्ष्मण वाघमारे	३/१/२०१२	८ वी पास	४/४/१९७६	४०	
३९	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.-१४२ दि. ०३-०१-२०१२	तुकाराम भगवंती मकदुम	४/१/२०१२	७ वी पास	२०/१२/१९६७	४९	S.M. Chavan
४०	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.-१४४ दि. ०३-०१-२०१२	प्रकाश शंकर मकदुम	५/१/२०१२	७ वी पास	१/६/१९७९	४१	Chavan P.P
४१	हमांक पुर्वा/कोयना/खरि/एस.आर.-१३१ दि. ०३-०१-२०१२	सर्वोत्तम प्रभाकर मकदुम	...	७ वी (वाहन चालक)	१४/०६/१९७१	३४	V.P. CHAVAN
४२	हमांक/पुर्वा/कोयना/खरि/४३४/ दि. २८/०८/२०१३	विजयसिंह संभाजी मोरे	३१/८/२०१३	४ थी पास	१/८/१९७६	४०	

परिशिष्ट-दोन

विभागाने सादर केलेली माहिती

परिशिष्ट - दोन 'अ'

महाराष्ट्र शासन

क्र.: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.०२/ऊर्जा-२
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २५ जानेवारी, २०१७

प्रति,

श्री. सुभाषचंद्र बर्वेकर,
विशेष कार्य अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई

विषय :- "विजयनगर व मुंढे, ता. कराड, जि. सातारा येथील कोयना प्रकल्पग्रस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (महापारेषण कंपनी) व शासनाच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी यांच्या कलानुसार प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून कायमस्वरुपी महापारेषण कंपनीच्या सेवेमध्ये नोकरी देण्याबाबत", या विषयावरील श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांचा विनंती अर्ज.

संदर्भ :- अवर सचिव समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांचे पत्र क्र. ५१८४९/न.वि.स/लिपिक/अल ड-१५, दि. ३१.१२.२०१६.

महोदय,

विषयांकित प्रकरणाची वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे :-

(अ) विजयनगर / मुंढे येथील जमिन संपादनामुळे बाधित झालेल्या व्यक्तींपैकी २३ प्रकल्पग्रस्त कंपनीच्या खर्चाने विजतंत्री या व्यवसायातील वेगवेगळ्या औद्योगिक प्रशिक्षणास इच्छुक आहेत. सदर इच्छुक प्रकल्पग्रस्तांना दि. ०४.०७.२०१२ च्या शासन निर्णयानुसार मंजूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांपैकी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, फलटण व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड, पुणे येथे त्यांच्या प्राधान्यक्रमानुसार प्रशिक्षणास पाठविण्याकरीता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडून सन २०१६-१८ करीता प्रत्येकी एक तुकडीची परवानगी प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदर २३ इच्छुक प्रकल्पग्रस्तांना कंपनीच्या खर्चाने औद्योगिक प्रशिक्षणास पाठविण्यात येत आहे.

(ब) औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर ज्यावेळी सरळसेवा भरतीचे रिक्त पदे भरण्याची जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल, त्यावेळी रीतसर अर्ज केल्यास सभी परीक्षेतील गुणवत्तेनुसार व प्रकल्पग्रस्तांकरीता असलेल्या कंपनीच्या धोरणानुसार त्यांना सेवेत सामावून घेण्यात येईल.

(क) महानिर्मिती कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांच्या धोरणाच्या धर्तीवर महापारेषण कंपनीचे जे पात्र प्रकल्पग्रस्त त्यांची शैक्षणिक अहर्ता कमी आहे किंवा ज्या प्रकल्पग्रस्तांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केली आहेत किंवा ज्या प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त दाखल्याच्या आधारे अन्य शासकीय अथवा निम शासकीय अथवा विज मंडळात / कंपनीत नोकरी मिळालेली नाही किंवा स्वत:चा व्यवसाय/ व्यवसाय उद्योग करु इच्छितात अशा इच्छुक प्रकल्पग्रस्तांना नोकरीच्या बदल्यात एकरकमी अनुदान रु. ५ लाख देण्याबाबतचा प्रस्ताव आहे.

२. सद्यःस्थितीत मौजे विजयनगर व मुंढे येथील २३ इच्छुक प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या प्राधान्यक्रमानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था, फलटण व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड

५५ कंपनीकडून प्रशिक्षणास पाठविण्यात आले आहे. सदर औद्योगिक प्रशिक्षण हे माहे ऑगस्ट-२०१६ मध्ये सुरु करण्यात आलेले आहे.

प्रकल्पग्रस्तांसाठी महाजारेषण कंपनीतर्फे खालील योजना राबविण्यात येत आहेत :-

प्रशासकीय परिपत्रक क्र. ३०२ दि. २५.११.२०११ अन्वये २ वर्षाच्या आय.टी.आय (विजतंत्री व्यवसाय) प्रशिक्षणासाठी आय. टी.आय. संस्थेकडे प्रतिनियुक्ती केली जाते व दरमहा रु. २०००/- इतके मानधन दिले जाते.

१. तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदासाठी सरळसेवा भरतीपधील लेखी ऑन लाईन परिक्षेस त्यांना मिळालेल्या गुणांच्या १० अतिरीक्त गुण (weightage) दिले जातात.

२. प्रकल्पग्रस्तांकरीता प्रगत कुशल प्रशिक्षण योजना, अतिरीक्त गुण योजना, नोकरीच्या बदल्यात एक रक्कमी अनुदान योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजने अंतर्गत ज्या प्रकल्पग्रस्तांनी आयटीआय (विजतंत्री) व्यवसाय परिक्षा उत्तीर्ण केली आहे, त्यांना कंपनीच्या प्रशिक्षण केंद्रात वयाची ४५ वर्ष पुर्ण होईपर्यंत अथवा कंपनीच्या नियमित सेवेत सामाविष्ट होईपर्यंत दरमहा रु. ६०००/- विद्यावेतन देण्यात येणार असून जे प्रकल्पग्रस्त ३ वर्षाचे प्रशिक्षण पुर्ण करतील त्यांना दरमहा रु. ८०००/- विद्यावेतन देण्यात येईल.

३. **प्रगत कुशल प्रशिक्षण योजना** — सदर योजने अंतर्गत विजतंत्री या व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण पुर्ण ही अर्हता धारण करतात अशा प्रकल्पग्रस्तांकरीता प्रगत कुशल प्रशिक्षण देणे. त्यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान मासिक विद्यावेतन देणे. सदर प्रशिक्षण हे प्रकल्पग्रस्तांची वयाची ४५ वर्ष पुर्ण किंवा कंपनीच्या सेवेत सामावून घेणे या पैकी जो कालावधी अगोदरचा असेल तोपर्यंत प्रशिक्षण चालू ठेवणे.

४. **अतिरिक्त गुण योजना** — प्रगतकुशल प्रशिक्षणार्थी यांचेकरीता तंत्रज्ञ श्रेणी-४ या पदाच्या सरळसेवा भरतीत त्यांनी लेखी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांव्यतिरिक्त २५ अतिरिक्त गुण देणे. सदर २५ अतिरिक्त गुण त्यांनी पुर्ण केलेल्या १ वर्षाच्या प्रगत कुशल प्रशिक्षणाकरीता ५ गुण असे ५ वर्षाकरीता म्हणजे जास्त २५ अतिरिक्त गुण देणे. तथापि, प्रगत कुशल प्रशिक्षण ही योजना सुरु होऊन २ वर्षाच्या आत कंपनीतर्फे खुली जाहिरात प्रसिध्द केल्यास सहसिवतीतील १०% अतिरिक्त गुणाच्या योजनेनुसार प्रकल्पग्रस्त उमेदवारांना त्यांनी लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांवर १०% अतिरिक्त गुण देणे.

५. **एकरक्कमी अनुदान योजना** — महाजारेषण कंपनीच्या पात्र प्रकल्प बाधीत व्यक्तीस नोकरीच्या बदल्यात विहित अटी व शर्तीवर एक रक्कमी रु.५ लाख अनुदान देण्याची योजना आहे.

कंपनीच्या प्रगत कुशल योजनेमधील प्रकल्पग्रस्तांना ५० % आरक्षण लागू करावे किंवा कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांना तंत्रज्ञ श्रेणी-४ च्या पदासाठी अधिकचे ८% आरक्षण देण्याबाबाचा प्रस्ताव मंजूर व पुनर्वसन आणि सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायासाठी सादर केला आहे.

आपला,

(अ. सी. पोकळारे)
अवर सचिव

परिशिष्ट - दोन ब

महाराष्ट्र शासन

email id :- milind.narkar@nic.in

क्र.: संकीर्ण-२०१७/प्र.क्र.०२/ऊर्जा-२
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २६ मे, २०१७

प्रति,

उप सचिव (ड-१५),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

विषय :- विजयनगर व मुंडे, ता. कराड, जि. सातारा येथिल कोयना प्रकल्पग्रस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, महापारेषण कंपनी व शासनाच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी यांच्या करारानुसार प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून कायमस्वरुपी महापारेषण कंपनीच्या सेवेमध्ये नोकरी देण्याबाबत या विषयावरील श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांच्या विनंती अर्जासंबंधी माहिती.

संदर्भ :- आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.१४९८/ म.वि.स / विपविअस/ ड-१५, दि. २३ मे, २०१७.

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्रात नमूद केल्यानुसार उपरोक्त विनंती अर्जातील विषयाबाबतच्या अद्ययावत माहितीच्या ४० प्रती आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात आल्या आहेत.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

आपला,

(भि. व. मंता)
उप सचिव

Received
29/5/17

ऊर्जा विभाग

विषय : विजयनगर व मुंढे ता. कराड, जि. सातारा येथील कोयना प्रकल्पग्रस्त व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ महापारेषण कंपनी व शासनाच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी यांच्या करारानुसार प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून कायमस्वरुपी महापारेषण कंपनीच्या सेवेमध्ये नोकरी देण्याबाबत या विषयावरील श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांच्या विनंती अर्जासंबंधी माहिती.

मा. श्री. आनंदराव पाटील व इतर मा. विधानपरिषद सदस्य यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन – २०१६ मध्ये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १६०६ च्या अनुषंगाने मा. मंत्री (ऊर्जा) महोदय यांनी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने महापारेषण कंपनीने खालील प्रमाणे कार्यवाही केलेली आहे :-

अ) विजयनगर / मुंढे येथील जमिन संपादनामुळे बाधित झालेल्या व्यक्तींपैकी २३ प्रकल्पग्रस्त व्यक्तींना कंपनीच्या खर्चाने "विजतंत्री" या व्यवसायातील दोन वर्षाच्या औद्योगिक प्रशिक्षणास पाठविण्यात आले आहे.

ब) औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर ज्यावेळी सरळसेवा भरतीने रिक्त पदे भरण्याची जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल, त्यावेळी त्यांनी रीतसर अर्ज केल्यास स्पर्धा परीक्षेतील गुणवत्तेनुसार व प्रकल्पग्रस्तांकरीता असलेल्या कंपनीच्या धोरणानुसार त्यांना सेवेत सामावून घेण्यात येईल.

क) महानिर्मिती कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांच्या धोरणाच्या धर्तीवर, महापारेषण कंपनीचे जे पात्र प्रकल्पग्रस्त ज्यांची शैक्षणिक अर्हता कमी आहे किंवा ज्या प्रकल्पग्रस्तांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केली आहेत किंवा ज्या प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त दाखल्याच्या आधारे अद्याप शासकीय अथवा निम शासकीय अथवा वीज मंडळात / कंपनीत नोकरी मिळालेली नाही किंवा स्वत:चा खाजगी व्यवसाय/ उद्योग करु इच्छितात अशा इच्छुक प्रकल्पग्रस्तांना नोकरीच्या बदल्यात एकरक्कमी रक्कम रु.५ लाख देण्याबाबत कंपनीने प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९२, दि. २०.०९.२०१६ निर्गमित केलेले आहे. ज्या प्रकल्पग्रस्तांची वयोमर्यादा ४५ वर्षापेक्षा जास्त आहे अशा तीन उमेदवारांना कळविण्यात आले आहे. तथापि, त्यांचेकडून प्रतिसाद मिळालेला नाही.

प्रकल्पग्रस्तांसाठी महापारेषण कंपनीतर्फे खालील योजना राबविण्यात येत आहेत :-

प्रशासकीय परिपत्रक क्र. ३०२ दि. २५.११.२०११ अन्वये २ वर्षाच्या आय.टी.आय. (विजतंत्री व्यवसाय) प्रशिक्षणासाठी आय.टी.आय. संस्थेकडे प्रतिनियुक्ती केली जाते व दरमहा रु. २०००/- इतके मानधन दिले जाते.

प्रशासकीय परिपत्रक क्र. ४५१ दि. २४.०९.२०१५ अन्वये तंत्रज्ञ श्रेणी - ४ या पदासाठी सरळसेवा भरतीमधील लेखी ऑन-लाईन परिक्षेस त्यांना मिळालेल्या गुणांच्या १० अतिरिक्त गुण (weightage) दिले जातात.

प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९२ दि. २०.०९.२०१६ नुसार प्रकल्पग्रस्तांकरीता प्रगत कुशल प्रशिक्षण योजना, अतिरिक्त गुण योजना, नोकरीच्या बदल्यात एक रक्कमी अनुदान योजना लागू

करण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत ज्या प्रकल्पग्रस्तांनी आयटीआय (वीजतंत्री) व्यवसाय परिक्षा उत्तीर्ण केली आहे, त्यांना कंपनीच्या प्रशिक्षण केंद्रात वयाची ४५ वर्षे पूर्ण होईपर्यंत अथवा कंपनीच्या नियमित सेवेत समाविष्ट होईपर्यंत दरमहा रु. ६०००/- विद्यावेतन देण्यात येणार असून जे प्रकल्पग्रस्त ३ वर्षांचे प्रशिक्षण पूर्ण करतील त्यांना दरमहा रु. ८०००/- विद्यावेतन देण्यात येईल.

१. **प्रगत कुशल प्रशिक्षण योजना** :- सदर योजने अंतर्गत "वीजतंत्री" या व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण (ITI in Electrician Trade) ही अर्हता धारण करणाऱ्या अशा प्रकल्पग्रस्तांकरीता प्रगत कुशल प्रशिक्षण देणे, त्यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान मासिक विद्यावेतन देणे, सदर प्रशिक्षण हे प्रकल्पग्रस्तांची वयाची ४५ वर्षे पूर्ण किंवा कंपनीच्या सेवेत सामावून घेणे या पैकी जो कालावधी अगोदरचा असेल तो पर्यंत प्रशिक्षण चालू ठेवणे.

२. **अतिरिक्त गुण योजना** :- प्रगतकुशल प्रशिक्षणार्थी यांचेकरीता तंत्रज्ञ श्रेणी – ४ या पदाच्या सरळसेवा भरतीत त्यांनी लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांव्यतिरिक्त २५ अतिरिक्त गुण देणे. सदर २५ अतिरिक्त गुण त्यांनी पूर्ण केलेल्या १ वर्षाच्या प्रगत कुशल प्रशिक्षणाकरीता ५ गुण असे ५ वर्षांकरीता जास्तीत जास्त २५ अतिरिक्त गुण देणे. तसेच, प्रगत कुशल प्रशिक्षण ही योजना सुरु होऊन २ वर्षांच्या आत कंपनीतर्फे खुली जाहिरात प्रसिध्द केल्यास सहयोगीतील १० % अतिरिक्त गुणांच्या योजनेनुसार प्रकल्पग्रस्त उमेदवारांना त्यांनी लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांवर १० % अतिरिक्त गुण देणे.

३. **एकरक्कमी अनुदान योजना** :- महाप्रेषण कंपनीच्या पात्र प्रकल्प बाधीत व्यक्तीस नोकरीच्या बदल्यात विहित अटी व शर्तीवर एक रक्कमी रु. ५ लाख अनुदान देण्याची योजना आहे.

----------x----------

परिशिष्ट–तीन

समितीच्या बैठका

पहिली बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक सोमवार, दिनांक २९ मे, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) मा. माणिकराव ठाकरे, उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि. प. स.

विशेष निमंत्रित :

श्री. आनंदराव पाटील, वि. प. स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव.

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

विभागीय अधिकारी–उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग :

(१) श्री. अरविंद सिंह, प्रधान सचिव,

(२) श्री. राजीव मित्तल, मुख्य व्यवस्थापक, महापारेषण

(३) श्री. सुरज वाघमारे, अतिरिक्त मानव संसाधन व्यवस्थापक

(४) श्री. सुरज गमरे, मुख्य व्यवस्थापक

(५) श्री. ध. स. फडतरे, अवर सचिव,

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव (ऊर्जा) व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

दुसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता कक्ष क्र. ०२, मळमजला, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे दालन, विधान भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

(३) नरेंद्र पाटील, वि.प.स.

(४) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

विशेष निमंत्रित :

(१) ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

(३) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव.

(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

सदर बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर विचारविनिमय करून तो संमत केला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.